## महत्त्वाचे



क्युबेक सिटी (कॅनडा): सेंटर व्हिडिओटॉन येथे आयोजित क्यूएमजेएचएल हॉकी स्पर्धेदरम्यान अँटोईन वाकड्चा राऊएन नोरांडा हस्कीस आणि क्युबेक रेपार्ट्सचा अँड्रयू कॉक्सहेड यांच्यात सुरु असलेली चुरस.

### रंधावा, चौरासिया संयुक्त तिसऱ्या स्थानी

मनीला: ज्योती रंधावा तिसऱ्या फेरीमध्ये अंतिम चार होलमध्ये दोन बर्डीसह ७४ चे स्कोअर करुन रिसोर्ट्स वर्ल्ड मनीला मास्टर्स गोल्फ टूर्नामेंटमध्ये संयुक्तरित्या तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. पहिल्या दोन फेरीनंतर संयुक्त अव्वल स्थानी असलेल्या रंधावाचे एकूण स्कोअर १३ अंडर आहे. अन्य एक भारतीय एसएसपी चौरासिया (७१) देखील संयुक्त तिसऱ्या स्थानावर आहे.

### राष्ट्रीय शॉटगन शूटिंग; ८०० जणांचा सहभाग

जयपूर: केंद्रिय माहिती व प्रसारण राज्यमंत्री कर्नल राज्यवर्धन सिंग राठोड यांच्या हस्ते ६० व्या राष्ट्रीय शॉटगन शूटिंग स्पर्धेचा शुभारंभ झाला. नॅशनल रायफल शूटिंग असोसिएशन आणि राजस्थान रायफल शूटिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत देशभरातील जवळपास ८०० खेळाडू सहभागी झाले आहेत. १२ ते २६ नोव्हेंबर दरम्यानही स्पर्धा होणार आहे.

### पायलटस्चा सहभाग

धर्मशाळा:पहिल्या इंडियन ओपन ॲक्युरसी पॅराग्लायडिंग स्पर्धेला येथून जवळपास ६० किलोमीटर दूर बीर बिलिंगमध्ये सुरुवात झाली आहे. यामध्ये १५ देशातील १०७ पायलट्सनी भाग घेतला आहे. त्यात भारतीय, रशियन आणि दक्षिण आफ्रिका, इटली, किर्गिस्तान व तुर्की येथील खेळाडू स्पर्धेत सहभागी झाले आहेत.




लोकमत समूहातर्फे ११ डिसेंबर रोजी आयोजित भव्य लोकमत औरंगाबाद मॅरेथॉन स्पर्धेत आपला सहभाग निश्चित करणारा प्रोझोन मॉलचा स्टाफ. सोबत डावीकडून संतोष राठोड, प्रमोद काळे, शकील सय्यद, अभिजित पालकर, कैलास ठाकरे, मुसा शेख, अझरुद्दीन शेख, अर्चना कायंदे, इफ्तेखार पठाण, कार्यकारी व्यवस्थापक जितेंद्रसिंग सलुजा, शब्बीर शेख, केंद्रप्रमुख अरशद मोहम्मद, संदीप साळवे, नवनाथ बागल, चंद्रशेखर पाटील, रौफ शेख, विशाल जाधव, संतोष अंभोरे, निवृत्ती सूर्यवंशी, वैजिनाथ जायभाये, रामराव देशमुख. लोकमत औरंगाबाद मॅरेथॉनच्या नावनोंदणी व अधिक माहितीसाठी ०२४० - ६६०४५०२ या क्रमांकावर संपर्क साधवा.

# वर्ल्ड चॅम्पियनशिपसाठी भारताचा बॉक्सिंग संघ आज होणार रवाना

**औरंगाबाद :** रशियातील सेंट पीटर्सबर्ग येथे होणाऱ्या युथ वर्ल्डचॅम्पियनशिप बॉक्सिंग स्पर्धेसाठी भारताचा संघ उद्या, रविवारी दिल्ली येथून रवाना होणार आहे.

वर्ल्डचॅम्पियनशिप स्पर्धा १६ ते २६ नोव्हेंबरदरम्यान रंगणार आहे. या स्पर्धेसाठी विद्यापीठ परिसरातील 'साई'च्या पश्चिम विभागीय केंद्रात मुख्य प्रशिक्षक गणपथी मनोहरन यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघाचे शिबीर ५ ऑक्टोबरपासून सुरु झाले होते. त्याआधी २ नोव्हेंबर रोजी संघ निवडण्यासाठी ट्रायल घेण्यात आली होती. त्यातून भारताचा संघ वर्ल्डचॅम्पियनशिपसाठी निवडण्यात आला होता. भारताचा बॉक्सिंग संघ पुढीलप्रमाणे : ४९ किलो : सचिन (हरियाणा), ५२ किलो : अन्वर (मद्रास इंजिनिअरिंग ग्रुप), ५६ किलो : ऐताज खान (आर्मी स्पोर्ट्स् इन्सिस्ट्यूट, पुणे), ६० किलो : अंकुश दहिया (हरियाणा), ६४ किलो : आशिष (हरियाणा), ६९ किलो : श्रीनिवास (मद्रास इंजिनिअरिंग ग्रुप). मुख्य प्रशिक्षक : गणपथी मनोहरन, प्रशिक्षक : ललित प्रसाद, संतोष बिरमोले, गिरीश पवार, सी. चोंगा, अभिषेक मालवीय.

शकील खान



रशियातील सेंट पीटसबर्ग येथे होणाऱ्या युथ बॉक्सिंग स्पर्धेसाठी सोमवारी सकाळी रवाना होणारा भारताचा बॉक्सिंग संघ. सोबत मुख्य प्रशिक्षक गणपथी मनोहरन.

### भारतीय बॉक्सर्सकडून भरीव कामगिरीची आशा : मुख्य प्रशिक्षक मनोहरन



गणपथी मनोहरन

रशियातील सेंट पीटर्सबर्ग येथे होणाऱ्या युथ वर्ल्डचॅम्पियनशिप बॉक्सिंग स्पर्धेत भारतीय संघ आठ मेडल्स जिंकतील, अशी आपल्याला आशा असल्याचे मत स्पर्धेसाठी रवाना होण्याआधी भारतीय बॉक्सिंग संघाचे मुख्य प्रशिक्षक गणपथी मनोहरन यांनी 'लोकमत'शी बोलताना सांगितले. विशेषत: सचिन, इताज खान, अंकुश, आशिष श्रीनिवास आणि नमन यांच्याकडून पदकांची अपेक्षा आहे. औरंगाबाद येथील 'साई'च्या पश्चिम विभागीय केंद्रात झालेल्या शिबिरात खेळाडूंकडून नेहमीपेक्षा जास्त कसून सराव करुन घेण्यात आला आहे. त्यांचे ट्रेनिंगही चांगले झाले असल्यामुळे खेळाडू नक्कीच भरीव कामगिरी करतील, असेही मनोहरन यांनी सांगितले.

# राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत औरंगाबाद तिसऱ्या स्थानावर

**औरंगाबाद :** मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत औरंगाबादने तिसरा क्रमांक मिळवला. शनिवारी झालेल्या लढतीत औरंगाबादच्या खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करताना सातारा संघावर ७८ विरुद्ध ३९ असा दणदणीत विजय मिळवला. औरंगाबादकडून सम्रान शौर्यन याने २५, विपुल कड याने १५, प्रणय वसाया याने १२, तेजस जाधव याने १५, शुभम् लाटे याने ११ बास्केट करीत औरंगाबादला तिसरा क्रमांक मिळवून देण्यात निर्णायक योगदान दिले. या यशाबद्दल औरंगाबाद जिल्हा व तालुका बास्केटबॉल संघटनेतर्फे मनजितसिंग दरोगा, गणेश कड, संजय डोंगरे, महेश भागवत, सुशांत शेळके, रौनक सिंग, तन्वीर दरोगा, विश्वास कड, प्रशांत बुरांडे, संदीप ढंगारे आदींनी खेळाडूंचे अभिनंदन केले.



# औरंगाबादला राज्य हॅण्डबॉल स्पर्धा

## सर्वसाधारण सभेत निर्णय : शिबीर, कार्यशाळा आयोजित करणार

**औरंगाबाद :** विविध वयोगटांच्या राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धा नवी मुंबई, कोल्हापूर, औरंगाबाद, नागपूर आणि मुंबई येथे रंगणार आहेत.

औरंगाबाद येथे नुकत्याच झालेल्या हौशी हँडबॉल असोसिएशन ऑफ महाराष्ट्राची सर्वसाधारण सभा पार पडली. प्रा. विजय बोरसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सर्वसाधारण सभेत महाराष्ट्रातील २२ संलग्न जिल्हे व शासकीय क्रीडा प्रबोधिनीचे ५९ प्रतिनिधी उपस्थित होते. या सर्वसाधारण सभेत राज्यभरात विविध वयोगटांच्या स्पर्धा घेण्याचा निर्णय झाला. त्यानुसार नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात ज्युनिअर मुलींची राज्य अजिंक्यपद स्पर्धा नवी मुंबई येथे आयोजित केली जाणार आहे.

मुलांची ज्युनिअर अजिंक्यपद स्पर्धा कोल्हापूर येथे १० ते १३ डिसेंबरदरम्यान रंगणार आहे. औरंगाबाद येथे जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात पुरुषांची वरिष्ठ राज्य अजिंक्यपद स्पर्धा आयोजित केली जाणार आहे.

डिसेंबरमध्ये नागपूर येथे महिलांची राज्य अजिंक्यपद स्पर्धा होणार आहे, तर सबज्युनिअर राज्य अजिंक्यपद स्पर्धा डिसेंबर महिन्यात मुंबई येथे रंगणार आहे. त्याचप्रमाणे २००८ ते २०१५ या कालावधीत तत्कालीन सचिवांना ऑडिट स्टेटमेंट आणि अकाऊंट जमाखर्च मेळ व इतर महत्त्वपूर्ण दस्तावेज हस्तांतरित केले नाही. त्यामुळे त्यांच्यावर राष्ट्रीय कायदेशीर कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील हँडबॉलला गतवैभव प्राप्त करुन देण्यासाठी हँडबॉल खेळाचे प्रशिक्षण शिबीर आयोजित करणे, पंच, प्रशिक्षकांची कार्यशाळा व दर्जेदार स्पर्धा आयोजित करण्याकडे भर देण्याचा निश्चय या सर्वसाधारण सभेत करण्यात आला. या सर्वसाधारण सभेत राज्य संघटनेचे महासचिव डॉ. सुरेश बोंगाडे, प्रबोधिनीचे शासकीय प्रतिनिधी म्हणून क्रीडा उपसंचालक सुभाष रेवतकर, उपाध्यक्ष एन.डी. पखाले, सहसचिव आर.डी. पाटील, मधू भांडारकर, इंदरजित रंधवा, कोषाध्यक्ष प्रवीण बोडके, प्रा. श्रीराम पवार, अली सिद्दीकी, मुंबईचे राष्ट्रीय खेळाडू साई हतंगडी, पंकज साळुंके, बाबा सोनवणे, डॉ. विवेक गुल्हाणे, महेंद्र कपूर, विजय मोटघरे, प्रफुल्ल खर्चे, शैलेश भगत, मनोज श्रीवास्तव, नितीन जंगीतवार, हरीश सतपती, औरंगाबाद जिल्हा संघटनेचे आबा सिरसाठ आदी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत औरंगाबाद, हिंगोली विजयी

**औरंगाबाद :** राज्य कबड्डी संघटना व जिल्हा संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने कन्नड येथे सुरु असलेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत चांगलीच चुरस वाढली आहे. आज झालेल्या सामन्यात रत्नागिरी, मुंबई उपनगर, पुणे, सोलापूर, औरंगाबाद व हिंगोली संघांनी विजय मिळवला.

कुमारी गटात रत्नागिरीने लातूरचा ३८-४, मुंबई उपनगरने पालघर संघाचा ४३-३०, मुंबई शहरने धुळे संघाचा ५८-१३, पुणे संघाने जळगावचा ५६-८, सोलापूरने जालना संघाचा ७२-११, मुंबईने अहमदनगरचा ४३-२६ गुणांनी पराभव केला.

कुमार गटात हिंगोलीने नांदेडचा ३५-११, सिंधुदुर्गने जळगावचा २६-२३, अहमदनगरने धुळे संघाचा ५२-२३, बीडने नाशिकचा ३३-२२ आणि औरंगाबादने लातूरचा २८-२५ गुणांनी पराभव केला. अन्य लढतींमध्ये सिंधुदुर्गने हिंगोलीचा ३९-१९, उस्मानाबादने नांदेडचा ६४-२२ अशा गुणांनी पराभव केला.

या स्पर्धेसाठी बीड, सातारा व सांगली या जिल्ह्यांनी प्रत्येकी २ संघ सहभाग घेण्यासाठी आणले होते; परंतु महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेशी संलग्नित संघांना खेळविण्याची परवानगी देऊन अनधिकृत संघांना ताकीद देऊन परत पाठवण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य हिंमत नरके, प्रसन्ना पाटील, सिद्धार्थ पाटील, विनायकराव पाटील आदींनी परिश्रम घेतले.



# पुणे, कोल्हापूर, क्रीडा प्रबोधिनी अंतिम फेरीत

**औरंगाबाद :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धेत पुणे, कोल्हापूर, क्रीडा प्रबोधिनीच्या संघांनी अंतिम फेरीत धडक मारली.

मुलींच्या गटात कोल्हापूर विभागाने पुणे विभागास ४-0 गोलने पराभूत केले. विजयी संघाकडून पूनम माने व कृष्णा माने यांनी प्रत्येकी २ गोल केले. दुसऱ्या उपांत्य फेरीत क्रीडा प्रबोधिनी संघाने नागपूर विभागास ७-0 गोल फरकाने मात दिली. विजयी संघाकडून मनिश्री शेडगे, गौरी मुकणे, उत्कर्षा काळे, कीर्ती ढेपे यांनी गोल केले.

मुलांच्या गटातील उपांत्य फेरीत पुणे विभागाने टायब्रेकरमध्ये मुंबई संघावर ५-२ अशी मात केली. या दोन संघात निर्धारित वेळेत २-२ अशी बरोबरी झाली होती. दुसऱ्या उपांत्य फेरीत कोल्हापूर विभागाने औरंगाबाद विभागावर ५-0 असा दणदणीत विजय मिळवला. उद्या सकाळी ९ वाजता मुलींच्या गटातील अंतिम सामना रंगणार आहे. मुलांच्या गटातील फायनल लढत सकाळी १० वाजता रंगणार आहे. पंच म्हणून राहुल लिंगायत, अकबर खान, समीर शेख, अजमत शेख, अमान शेख यांनी काम पाहिले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी ऊर्मिला मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली उमेश बडवे, क्रीडा अधिकारी गुरुदीपसिंग संधू, कृष्णा केंद्रे, सदानंद सवळे, श्यामसुंदर भालेराव, संजय तोटावाड, रणजित भारद्वाज, आकाश हांडे आदी परिश्रम घेत आहेत.

(क्रीडा प्रतिनिधी)

# शहर पोलीसची एमआरबीवर मात

## औद्योगिक क्रिकेट स्पर्धा : मनपाची माघार

**औरंगाबाद :** गरवारे क्रीडा संकुलावर सुरु असलेल्या राम कमला औद्योगिक क्रिकेट स्पर्धेत शहर पोलीस अ संघाने शनिवारी एमआरबी ब संघावर मात केली. अन्य लढतीत ग्रामीण पोलीसविरुद्ध खेळाडूंच्या वर्तनामुळे नाराज होऊन मनपा संघाने ऐन सामन्यातून माघार घेतली.



आसेफ शेख

शहर पोलीस अ संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ बाद १२८ धावा केल्या. त्यांच्याकडून आसेफ शेखने ६४ चेंडूंत ७ चौकार व एका उत्तुंग षटकारासह सर्वाधिक ६८ धावा केल्या.

सुदर्शन एखंडेने १९ व अरविंद शेजूळने १४ धावांचे योगदान दिले. एमआरबी संघाकडून नसीर खानने २१ धावांत ३ व सय्यद शाहेदने २ गडी बाद केले.

प्रत्युत्तरात एमआरबी संघ ५ बाद १०६ पर्यंत मजल मारु शकला. त्यांच्याकडून रेहान हुसैनने सर्वाधिक २८, सय्यद शाहेदने नाबाद २६, नासीर खानने नाबाद १८ धावा केल्या. शहर पोलीसकडून शेख जिलानी याने २ व सुशील अरकने १ गडी बाद केला.

### खेळाडूंच्या खराब वर्तनामुळे मनपा आयुक्त नाराज

- मनपा आणि ग्रामीण पोलीस यांच्या लढतीत ग्रामीण पोलीसच्या खेळाडूंच्या सामन्यादरम्यानच्या खराब वर्तनामुळे मनपा संघातील मनपा आयुक्त ओम प्रकाश बकोरिया व सिडको प्रशासक सुनील केंद्रेकर हे नाराज झाले. अखेर मनपाने हा सामन्यातून माघार घेण्याचा निर्णय घेतला.
- या सामन्यात ग्रामीण पोलिसच्या फलंदाजाने पायचीतविषयी पंचाविरुद्ध आक्षेप नोंदवला होता. तसेच मैदानाबाहेरुन पंचांशी वाद घालण्याचा प्रयत्न केला होता.

# सोनखेडा येथे कबड्डी स्पर्धा

**औरंगाबाद :** खुलताबाद तालुक्यातील मौजे सोनखेडा येथील जि.प. शाळेच्या क्रीडांगणावर रविवारपासून राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रवादी कॉंग्रेस उपजिल्हा अध्यक्ष विलास चव्हाण, दिनेश अंभोरे, कृष्णा कुकलारे, नजीर पठाण, प्रकाश वाकळे, ज्ञानेश्वर बारगळ, संजय देवकर, अनिल चव्हाण यांच्या उपस्थितीत होणार आहे. विजयी संघासाठी १५ हजार १५, उपविजेत्यास ११ हजार ११ रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे. तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावरील संघास अनुक्रमे ७ हजार ७७ व ५ हजार ५५ रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहेत. या स्पर्धेत जास्तीत जास्त संघांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजक टिळक क्रीडा मंडळातर्फे करण्यात आले आहे.



सर्व चहांमध्ये नैसर्गिक रूपातील फ्लेवोनॉइड्स असतात. निरोगी आहार आणि जीवन शैलीसाठी 3 कप चहा प्या. ब्लॅक टी पिणे जास्त आरोग्यदायक आहे.

